क्र. १५० पहिले वर्ष

२५ जून २०२३

# रविवारची उपासना

## सामान्यकाळातील बारावा रविवार

### प्रस्तावना

''भिऊ नका, पुष्कळ चिमण्यांपेक्षा तुमचे मोल अधिक आहे.'' परमेश्वराठायी आपण सर्वजण खूप मौल्यवान आहोत. प्रभू म्हणतो, ''मी तुला गर्भाशयात धाडिले. त्यापूर्वी तू मला ठाऊक होतास.'' परमेश्वर म्हणतो, ''मी तुला आपल्या तळहातावर कोरून ठेवले आहे.'' ह्याचाच अर्थ परमेश्वराला आपल्या अस्तित्वाची पूर्णपणे जाणीव आहे. परमेश्वर सतत आपल्याबरोबर आहे व तो सर्व परिस्थितीत आपले संरक्षण करीत असतो. आजच्या शुभवर्तमानात प्रभू येशू म्हणतो, ''तुमच्या डोक्यावरचे केस देखील मोजलेले आहेत.'' आपण सर्वजण त्याचे निवडलेले आणि अभिषिक्त भक्तगण आहोत. आपल्या शब्दांद्वारे व आचरणाद्वारे आपण इतरांना ख्रिस्त देण्याचा प्रयत्न करू या. परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव आपल्याला सतत व्हावी म्हणून आपला विश्वास दृढ व्हावा व परमेश्वराची सुवार्ता पसरविण्यास आपल्याला प्रेरणा लाभावी म्हणून ह्या पवित्र मिस्साबलीत विशेष प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे सर्वसमर्थ बापा, तुझ्या प्रजाजनांच्या मार्गदर्शका व संरक्षका, तुझ्या नावाचा आम्ही न चुकता सन्मान करावा म्हणून आम्हांला साहाय्य कर. तुझ्या प्रीतीच्या छत्राखाली आम्हांला कायम ठेव. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**यिर्मया या पुस्तकातून घेतलेले वाचन २०:१०-१३**

**''परमेश्वर दुष्टांच्या हातून दीनजनांचा जीव वाचवतो.''**

यिर्मया म्हणाला, ''मी पुष्कळांस कुजबुजताना ऐकतो. चोहोकडे दहशत आहे. मला ठेच लागावी म्हणून टपणारे माझे सर्व इष्टमित्र म्हणतात की, 'त्याच्याविरुध्द गिल्ला करा. आपण त्याच्याविरुध्द गिल्ला करू.' 'कदाचित तो फसेल, म्हणजे त्याच्याहून आपण प्रबळ होऊन त्याचा सूड उगवू. तरी परमेश्वर पराक्रमी वीराप्रमाणे माझ्याबरोबर आहे, म्हणून माझा छळ करणारे ठोकर खातील, ते प्रबळ होणार नाहीत. ते शहाणपणाने वागले नाहीत म्हणून ते अत्यंत फजीत होतील. विसर न पडेल अशी त्यांची कायमची अप्रतिष्ठा होईल. तरी हे धार्मिकाचे सत्व पाहणाऱ्या, अंतर्याम आणि हृदय पारखणाऱ्या, सेनाधीश परमेश्वरा, तू त्यांचा सूड घेशील तो मला पाहू दे. कारण मी आपली फिर्याद, तुझ्यापुढे सादर केली आहे.

परमेश्वरापुढे गाणे गा. परमेश्वराचे स्तवन करा, कारण तो दुष्टांच्या हातून दीन जनांचा जीव वाचवतो.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**६८:८-१०,१४, १७, ३३-३५**

प्रतिसादः **हे देवा, मला उत्तर दे.**

१. तुझ्याकरिता मी निंदा सहन केली आहे, लज्जेने माझे मुख व्याप्त झाले आहे, मी आपल्या भावास नवखा, माझ्या सहोदरांस परका असा झालो आहे. तुझ्या मंदिराविषयीच्या आवेशाने मला ग्रासून टाकले आहे. निंदा करणाऱ्यांनी केलेली तुझी निंदा माझी निंदा झाली आहे.

२. मी तर, हे परमेश्वरा, तुला मान्य होईल अशासमयी तुझी प्रार्थना करतो. हे देवा तू आपल्या महान दयेस अनुसरून आणि आपण सिध्द केलेल्या उध्दाराच्या सत्यास अनुसरून मला उत्तर दे. हे परमेश्वरा, माझे ऐक, कारण तुझे वात्सल्य उत्तम आहे. आपल्या करुणेस अनुसरून माझ्याकडे वळ.

३. दीनजन हे पाहून हर्ष करतील, देवाचा शोध करणाऱ्यांनो, तुमच्या हृदयात नवजीवन येवो. कारण परमेश्वर दीनजनांचे ऐकतो आणि बंदीत पडलेल्या आपल्या लोकांना तो तुच्छ मानत नाही. आकाश, पृथ्वी, समुद्र आणि त्यात संचार करणारे सर्व प्राणी त्याचे स्तवन करोत.

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ५:१२-१५**

**''जशी अपराधाची गोष्ट आहे तशी कृपादानाची नाही.''**

एका माणसाद्वारे पाप जगात शिरले आणि पापाच्याद्वारे मरण शिरले आणि सर्वांनी पाप केल्यामुळे सर्व माणसांमध्ये अशाप्रकारे मरण पसरले. कारण नियमशास्त्रापूर्वी पाप जगात होतेच, पण नियमशास्त्र नसले म्हणजे पाप गणण्यात येत नाही. तथापि आदामपासून मोशेपर्यंत मरणाने राज्य केले. ज्यांनी आदामच्या उल्लंघनाच्या प्रकाराप्रमाणे पाप केले नाही त्यांच्यावरही त्याने राज्य केले. आदाम तर जो येणार होता त्याचे प्रतिरुप आहे.

परंतु जशी अपराधाची तशी कृपादानाची गोष्ट नाही. कारण ह्या एका मनुष्याच्या अपराधाने पुष्कळ माणसे मरण पावली तर देवाची कृपा आणि एक मानव येशू ख्रिस्त ह्याच्या कृपेचे दान ही पुष्कळ जणांकरिता विशेषकरून विपुल झाली.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान १५:१५**

**आलेलुया, आलेलुया!**

प्रभू म्हणतो, मी तुम्हांस मित्र म्हटले आहे,

कारण जे काही मी आपल्या पित्याकडून ऐकून घेतले, हे सर्व मी तुम्हांस कळवले आहे.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन १०:२६-३३**

**''जे शरीराचा वध करतात त्यांना भिऊ नका.''**

येशूने आपल्या बारा शिष्यांस पुढीलप्रमाणे बोध केला :

''ह्यास्तव भिऊ नका, कारण उघडकीस येणार नाही असे काही झाकलेले नाही आणि कळणार नाही असे काही गुप्त नाही. जे मी तुम्हास अंधारात सांगतो ते उजेडात बोला आणि तुमच्या कानात सांगितलेले जे तुम्ही ऐकता ते घराच्या गच्चीवरून घोषित करा. जे शरीराचा घात करतात पण आत्म्याचा घात करावयास समर्थ नाहीत त्यांना भिऊ नका, तर आत्मा आणि शरीर ह्या दोहोंचा नरकात नाश करावयास जो समर्थ आहे त्याला भ्या. दोन चिमण्या दमडीला विकतात की नाही? तथापि, तुमच्या पित्यापासून त्यातून एकही भूमीवर पडणार नाही. तुमच्या डोक्यावरचे सर्व केसदेखील मोजलेले आहेत म्हणून भिऊ नका. पुष्कळ चिमण्यांपेक्षा तुमचे मोल अधिक आहे. जो कोणी माणसांसमोर मला पत्करील त्याला मीही

केसदेखील मोजलेले आहेत म्हणून भिऊ नका. पुष्कळ चिमण्यांपेक्षा तुमचे मोल अधिक आहे. जो कोणी माणसांसमोर मला पत्करील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर पत्करील, पण जो कोणी माणसांसमोर मला नाकारील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर नाकारील.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू**

ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या, तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा आपण विश्वास बाळगू या.

आपला प्रतिसाद असेल – **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. परमेश्वराच्या कळपाच्या आध्यात्मिक व सामाजिक प्रगतीसाठी झटणारे आपले पोप फ्रान्सिस, बिशप, सर्व धर्मगुरू व व्रतस्थ यांचे जीवन कृपेने भरलेले असावे व सर्वांकडून त्यांना सहकार्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करूया.

२. आपल्या राजकीय, सामाजिक व शासकीय अधिकाऱ्यांनी त्यांची नियुक्ती सामाजिक हितासाठी आहे याची जाणीव ठेवावी व आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. ख्रिस्ती म्हणून जगत असताना आपल्या पाचारणाची आपल्याला आठवण असावी, आपल्या शब्दाद्वारे व कृतीद्वारे आपण सुवार्तेचा प्रचार करावा, तसेच जे लोक सुवार्ता प्रचारासाठी हातभार लावत आहेत त्यांना चांगले आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. अतिवृष्टीपासून निर्माण होणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आपण तयार असावे, पूर परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून उपाययोजना केली जावी, शेतीसाठी व पिण्यासाठी आवश्यक असणारा मुबलक पाऊस अपाल्याला मिळावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. जे लोक आजारी आहेत ते लवकर बरे व्हावेत, परगावी व परदेशी असणारे आपले बांधव सुरक्षित असावेत, तसेच नैसर्गिक व इतर आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू**

हे पित्या, तुझ्या लोकांच्या या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्याचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, आमच्या भेटीचा स्वीकार कर. या स्तुतीमय बलिदानाद्वारे आमचे मन व शरीर पवित्र कर आणि तुझी सेवा करण्यास आम्हांला सदैव उत्सुक ठेव. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, तुझ्या कृपेचे आम्हामध्ये नूतनीकरण करण्यासाठी तू आपल्या पुत्राचे रक्त व शरीर आम्हाला देतोस. आम्हांला आमच्या तारणाबद्दल निश्चिंत कर व या बलिदानामध्ये उपस्थित होत असलेले शाश्वत जीवन शेवटी आम्हाला दान कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो .

## चिंतन

'खरे सुख कशात आहे?' हा प्रश्न मनुष्य आयुष्यभर विचारीत असतो. बालपणी त्याला शारीरिक पातळीवरील सुखाचा अनुभव येत असतो. कोणी जवळ केले, आपल्याला थोपटले, आपला मुका घेतला की बाळाला बरे वाटते.किशोरवयात ज्ञान मिळविण्यात सुख मिळते. तरुणपणात भावनिक व सांस्कृतिक सुखाकडे तर प्रौढपणात सामाजिक सुखाकडे त्याचा ओढा असतो. शेवटी, आध्यात्मिक सुखाकडे आल्यावर 'तळ नसलेल्या बादलीत आपण सर्वकाही जमा करीत राहिलो' अशी भावना त्याला अस्वस्थ करू लागते, आणि सर्वसंग परित्याग करण्यास तो तयार असतो. आजची वाचने सुखाचे तीन पैलू उलगडून सांगतात :

**१) दु:खापासून पळून न जाता त्याला सामोरे जाणे :** दु:ख टाळल्याने नव्हे तर त्याला सामोरे जाऊन पुढे पुढे जात राहणे यातच सुख दडलेले आहे. परमेश्वर ज्या लोकांची निवड केली त्यांना वाटले होते की, सर्व काही आता सुखासुखी असणार आहे, मात्र प्रत्यक्ष ते जेव्हा देवाच्या सांगण्याप्रमाणे जीवन जगू लागले तेव्हा त्यांना पदोपदी दु:खाचा सामना करावा लागला मग तो मोशे असो, दाविद असो की आजच्या पहिल्या वाचनातील यिर्मया संदेष्टा असो.

**२) आज्ञाभंगाद्वारे नव्हे आज्ञापालनाद्वारे दु:ख झेलणे :** सुखाची आस धरून आदाम एवा ह्यांनी आज्ञाभंग केला त्यामुळे त्यांना अमरत्व, ऐक्य आणि सुख अशा सर्व गोष्टींना मुकावे लागले. त्याऐवजी मरण, परस्परवैर आणि कष्ट त्यांच्या वाटेला आले. प्रभू येशूने मात्र दु:खाला मिठी मारून आपल्यासाठी सार्वकालिक सुख मिळविलेले आहे.

**३) शारीरिक दु:खाचे नव्हे तर आध्यात्मिक दु:खाचे भान ठेवणे :** शारीरिक दु:ख टाळून, आज्ञाभंग करून माणूस आध्यात्मिक दु:ख (अपराधीपणाची भावना, स्वत:शी, देवाशी, इतरांशी प्रामाणिक नसल्याची टोचणी) भोगत राहतो. येशू आपल्या शिष्यांना शिकवितो की, त्यांनी जे शरीराचा घात व नाश करतात त्यांना नव्हे तर शरीर व आत्मा ह्या दोहोंचा नरकात नाश करण्यास जो समर्थ आहे त्या परमेश्वराचे भय धरावे कारण देवाचे भय हा ज्ञानाचा (व सुखाचा) प्रारंभ होय.

**आत्मपरीक्षण :** सुखी जीवनाविषयी माझी काय संकल्पना आहे? माझ्या जीवनातील दु:खे मी कशाप्रकारे हाताळतो? मी खरोखर सुखी आहे का?

**संत पीटर व पौल :** संत पीटर हा यहुद्यांचा तर संत पौल हा पराराष्ट्रीयांचा प्रेषित होता. त्या दोघांना रोम शहरात रक्तसाक्षीत्वाचे मरण आले. आजची तिन्ही वाचने त्यांचे प्रेषितकार्य, त्यांचे रक्तसाक्षीत्व आणि त्यांना लाभलेले स्वर्गीय प्रतिफळ स्पष्ट करणाऱ्या तीन शब्दप्रतिमा आपल्यासमोर सादर करतात.

**अ) पेत्राला देण्यात आलेल्या स्वर्गाया किल्ल्या प्रेषितीय अधिकाराचे प्रतीक आहेत :** आजच्या शुभवर्तमानात (मत्तय १६:१३-१९) येशू हा ख्रिस्त असल्याची पेत्राने दिलेली कबुली आपल्यापुढे सादर करण्यात आलेली आहे. त्याचवेळी येशूनेदेखील शिमोन हा पेत्र म्हणजे खडक असल्याचे जाहीर केले आणि त्याला स्वर्गाच्या किल्ल्या देण्याचे अभिवचन दिले. आजही पोपमहोदयांच्या बोधचिन्हामध्ये एक सोनेरी (स्वर्गीय अधिकार) व एक चंदेरी (पृथ्वीवरील अधिकार) रंगाची अशी दोन किल्ल्या आढळतात.

**ब) हेरोदची तरवार हे ख्रिस्तशिष्याच्या दु:खसहनाचे प्रतीक होय :** आजच्या पहिल्या वाचनात (प्रे.कृ.१२:१-११) याकोबच्या शिरच्छेदाचा उल्लेख केल्यानंतर पेत्राच्या तुरुंगवासातून सुटकेचे वर्णन करण्यात आलेले आहे. मात्र पुढे पेत्राला क्रूसावर उलटे टांगून तर संत पौलचा शिरच्छेद करून रोम शहरात मरण पत्करावे लागले. दु:खसहन हा ख्रिस्ती शिष्यत्वाचा एक अविभाज्य घटक होय.

**क) नीतिमत्त्वाचा मुकुट हे विश्वासू ख्रिस्तशिष्याचे स्वर्गीय प्रतिफळ होय :** आजच्या दुसऱ्या वाचनात (२ तीमथ्य ४:६-८, १७-१८) संत पौल निरावानिरव करताना आपल्यासाठी एक नीतिमत्त्वाचा मुकुट तयार आहे असे अगदी आत्मविश्वासाने सांगतो. शेवटपर्यंत आपल्या प्रेषितकार्याशी विश्वासू राहणाऱ्या ख्रिस्तशिष्याला अविनाशी असा स्वर्गीय मानाचा मुकुट मिळाल्याशिवाय राहात नाही असे तो सुचवितो.

आत्मपरीक्षण : वरीलपैकी कोणती शब्दप्रतिमा मला सर्वात अधिक भावते? का?

●●●

| जून/जुलै २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | चौथा सप्ताह |
|---|---|---|
| सोम २६ | सं जोसेमरिया (हि) | : उत्पत्ती १२:१-९/मत्तय ७: १-५ |
| मंगळ २७ | अलेक्झांड्रियाचा सं सिरिल (हि) | : उत्पत्ती १३:२,५-१८/मत्तय ७:६, १२-१४ |
| बुध २८ | सं आयरेनियूस (तां) | : उत्पत्ती १५:१-१२,१७-१८/मत्तय ७:१५-२० |
| गुरू २९ | सं पेत्र आणि सं पॉल (तां) | : प्रे.कृ. १२:१-११/ २ तिमथी ४: ६-८, १७-१८/मत्तय१६:१३-१९ |
| शुक्र ३० | रोमन ख्रिस्तसभेचे पहिले रक्तसाक्षी (हि/तां) | : उत्पत्ती १७:१,९-१०,१५-२२/मत्तय ८:१-४ |
| शनि ०१ | धन्य जुनिपेरो सेरा (हि) | : उत्पत्ती १८:१-१५/मत्तय ८:५-१७ |